

१४ जुलै २०२३ हा दिवस देशाच्या अंतराळ इतिहासामध्ये सोनेरी अक्षरांनी नोंदवला जाईल. आजच्याच दिवशी आपल्या चांद्रयान ३ मिशनने यशस्वी उड्डाण घेतलं. देशवासियांच्या आशांचे आणि स्वप्नांची ही यशस्वी झेप आहे.


दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ५९ वा ● शनिवार १५ जुलै २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| Volume 1 | Issue 59 | Date : 15/07/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4


# चांद्रयान ३ ची यशस्वी झेप

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था : भारताचे 'चांद्रयान-३' हे महत्त्वाकांक्षी यान शुक्रवारी दुपारी यशस्वीरीत्या चंद्राच्या दिशेने झेपावले आणि भारताने अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात भरारी घेतली. 'काउंट डाऊन' संपताच ज्वाळांचे लोट खाली सारत इस्रोच्या 'बाहुबली रॉकेट' म्हणजेच डत्तच्-३ मधून चांद्रयान-३ वेगाने आकाशाच्या दिशेने झेपावला. आसमंत हादरवणाऱ्या रॉकेटच्या आवाजात टाळ्या-शिट्ट्यांसह 'भारत माता की जय'च्या घोषणाही निनादल्या.**

श्रीहरीकोटा येथे देशभरातून आलेल्या आबालवृद्धांच्या समुदायाने भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या (इस्रो) शास्त्रज्ञांची आणि स्वदेशी तंत्रज्ञानाची कमाल 'याची देहि याची डोळा' अनुभवली. देशाच्या तिसऱ्या चांद्रमोहिमेचा पहिला टप्पा यशस्वीपणे सर झाला आणि 'चांद्रयान-३' चंद्राच्या दिशेने मार्गस्थ झाले. इस्रोच्या शास्त्रज्ञांसह भारतीयांनी विजयी जल्लोष केला. भारताच्या या मोहिमेकडे संपूर्ण जगाचं लक्ष लागलं होतं. भारताची चांद्रयान-तीन ही मोहीम यशस्वी ठरली तर अमेरिका, रशिया आणि चीननंतर चंद्रावर यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला आहे. या मोहिमेसाठी भारताने तब्बल ६१५ कोटी रुपये खर्च केलेत. चांद्रयान-३ अंतराळयान २३ ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याची अपेक्षा आहे. चांद्रयान-३ ने ४० दिवसांचा प्रवास पूर्ण केल्यानंतर विक्रम लँडरच्या साहाय्याने प्रज्ञान रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरेल.

**चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार चांद्रयान-३**

३.८४ लाख किलोमीटरचा प्रवास केल्यानंतर चांद्रयान-३ चंद्राच्या पृष्ठभागावर उतरेल. सर्व काही ठरल्याप्रमाणे पार पडलं तर, चांद्रयान २३ ऑगस्ट रोजी चंद्रावर उतरण्याची शक्यता आहे. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडरचे उतरणं हे चांद्रयान-३ मोहिमेचं पहिलं लक्ष्य आहे. याआधीचा चांद्रयान-२ द्वारे चंद्रावर उतरण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला होता. त्यानंतर इस्रो पुन्हा चार वर्षानंतर चंद्रावर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करणार आहे. रोव्हर चंद्राच्या पृष्ठभागावर उतरल्यानंतर तेथील माहिती गोळा करुन चंद्राची रहस्यं उलगडण्यास मदत होईल. चांद्रयान-३ चे वातावरणापासून संरक्षण करणारी हीट शील्ड सुमारे ९२ किमी उंचीवर रॉकेटपासून वेगळी होईल. ११५ किमी अंतरावर चांद्रयानाचं इंजिन देखील वेगळं होईल आणि क्रायोजेनिक इंजिन कार्य करण्यास सुरुवात करेल. याचा वेग १६ हजार किमी प्रति तास । **पान २ वर**

## राज्य मंत्रिमंडळातील नवनियुक्त खातेवाटप जाहीर

मुंबई : राज्य मंत्रिमंडळातील नवनियुक्त मंत्र्यांच्या खातेवाटपाबरोबरच सध्याच्या मंत्र्यांच्या खात्यांमध्येदेखील काही फेरबदल करुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज खातेवाटप जाहीर केले आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी मंजुरी दिल्यानंतर हे खातेवाटप जाहीर करण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे** यांच्याकडे सामान्य प्रशासन, नगर विकास, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, परिवहन, सामाजिक न्याय, पर्यावरण व वातावरणीय बदल, खनिकर्म आणि इतर कोणत्याही मंत्र्यांना वाटप न केलेले विभाग

**उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** यांच्याकडे गृह, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार ही खाती असतील.

**उपमुख्यमंत्री अजित पवार** यांच्याकडे वित्त व नियोजन हे खाते राहील.

**इतर २६ मंत्र्यांची खाती पुढीलप्रमाणे** : छगन भुजबळ - अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण दिलीपराव दत्तात्रय वळसे-पाटील - सहकार * राधाकृष्ण विखे-पाटील - महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास * सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार- वने, सांस्कृतिक कार्य, व मत्स्य व्यवसाय * हसन मियाँलाल मुश्रीफ - वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य * चंद्रकांतदादा बच्चू पाटील - उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य * विजयकुमार कृष्णराव गावित- आदिवासी विकास * गिरीष दत्तात्रय महाजन- ग्राम विकास आणि पंचायत राज, पर्यटन * गुलाबराव पाटील- पाणीपुरवठा व स्वच्छता * दादाजी दगडू भुसे - सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) * संजय दुलिचंद राठोड- मृद व जलसंधारण* धनंजय पंडितराव मुंडे - कृषि * सुरेश दगडू खाडे- कामगार * संदीपान आसाराम भुमरे- रोजगार हमी योजना व फलोत्पादन * उदय रविंद्र सामंत- उद्योग * प्रा.तानाजी जयवंत सावंत- सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण * रवींद्र दत्तात्रय चव्हाण - सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), * अब्दुल सत्तार- अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन

* दीपक वसंतराव केसरकर- शालेय शिक्षण व मराठी भाषा * धर्मरावबाबा भगवंतराव आत्राम - अन्न व औषध प्रशासन * अतुल मोरेश्वर सावे - गृहनिर्माण, इतर मागास व बहुजन कल्याण * शंभूराज शिवाजीराव देसाई- राज्य उत्पादन शुल्क * कु. आदिती सुनिल तटकरे - महिला व बालविकास * संजय बाबुराव बनसोडे - क्रीडा व युवक कल्याण, बंदरे * मंगलप्रभात लोढा- कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता * अनिल पाटील - मदत पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन.

## राज्यात शिक्षक भरतीचा जीआर आजच, पहिल्या टप्प्यात ३० हजार शिक्षकांची भरती: मंत्री केसरकर यांची घोषणा

मुंबई : राज्यात शिक्षण भरतीचा आजच जीआर काढणार असून पहिल्या टप्प्यात ३० हजार शिक्षकांची भरती होणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली आहे. तर राज्यात एकूण ५० शिक्षकांची भरती होणार असल्याचं देखील त्यांनी यावेळी म्हटलं आहे. औरंगाबाद हायकोर्टाने स्थगिती दिल्याने शिक्षक भरतीचं काम रखडलं होतं असं मंत्री दीपक केसकरांनी सांगितलं आहे. 'आम्ही भरतीची प्रतिक्रिया सुरु केली होती. परंतु औरंगाबाद हायकोर्टाने स्थगिती दिल्याने कोणतीच प्रक्रिया करता येत नव्हती', असं दीपक केसकर यांनी म्हटलं. पुढे बोलतांना त्यांनी म्हटलं की, 'आता हायकोर्टाने त्यांची स्थगिती उठवली आहे, त्यामुळे शिक्षक भरतीचे परिपत्रक आजच काढण्यात येणार आहे.'



राज्यात करण्यात येणारी शिक्षक भरती ही दोन टप्प्यांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती देखील मंत्री दीपक केसरकर यांनी दिली आहे. पहिल्या टप्प्यात राज्यात ३० हजार शिक्षकांची भरती होणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात राज्यात २० हजार शिक्षकांची भरती होणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी दिली आहे. दरम्यान परवानगी मिळाल्यास १०० टक्के शिक्षक भरती करु असं देखील दीपक केसरकरांनी म्हटलं होतं. पण त्यानंतर शिक्षक भरतीला कोणताही वेग आला नाही. मात्र आता केलेल्या घोषणेनंतर राज्यात लवकरच शिक्षण भरतीचा प्रक्रिया सुरु होणार असल्याची माहिती मिळत आहे. या प्रक्रियेला अजून महिनाभर लागेल असं देखील केसरकरांनी म्हटलं आहे. त्यामुळे अजूनही राज्यात शिक्षक रुजू होण्यासाठी जवळपास महिनाभराचा अवधी असल्याचं यावरुन स्पष्ट झालं आहे.

राज्यात शिक्षण व्यवस्थेचा दर्जा घसरल्यानंतर राज्यातील शिक्षकांची संख्या हे महत्त्वपूर्ण कारण देण्यात आलं होतं. अनेक शाळांमध्ये पुरेसे शिक्षक नसल्याने त्यांच्यावर अधिकचा । **पान २ वर**

## शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा, गेल्या तीन वर्षांचे पुरस्कार जाहीर

मुंबई : क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी बजावलेल्यांचा सन्मान राज्य सरकारकडून करण्यात आला आहे. राज्य शासनाकडून दिला जाणारा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार आज जाहीर करण्यात आला आहे. मागील तीन वर्षांचे क्रीडा पुरस्कार जाहीर करण्यात आले आहे. क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषद घेवून क्रीडा पुरस्काराची नावे जाहीर केली. सन २०१९-२० मधील क्रीडा पुरस्कार ठाण्यातील श्रीकांत शरदचंद्र वाड यांना देण्यात आला आहे. तर २०२१-२२ मधील जीवन गौरव पुरस्कार मुंबईचे आदिल जहांगिर सुमारीवाला यांना जाहीर करण्यात आला आहे. साताऱ्याच्या स्नेहल विष्णू मांढरे हिला राज्य शासनाने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर केला आहे. आर्चरी खेळात उत्तुंग कामगिरी करणा-या स्नेहलला सन २०१९-२० या कालावधीतील पुरस्कार जाहीर झाला आहे.गिरीश महाजन म्हणाले ,राज्यात क्रीडा संस्कृतिचा वारसा जपला जाऊन त्याचे संवर्धन व्हावे, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणा-या क्रीडा महर्षि, मार्गदर्शक, खेळाडू, यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्यात येतात. राज्यातील क्रीडा महर्षी, मार्गदर्शक, खेळाडू यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार देण्यात येतो. राज्य सरकारने आज गेल्या । **पान २ वर**

## १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत दोन आठवड्यांत उत्तर द्या, सर्वोच्च न्यायालयाची विधानसभा अध्यक्षांना नोटीस

मुंबई :मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य शिवसेना आमदारांविरोधात अपात्रतेच्या प्रलंबित नोटिशींवर तातडीने निर्णय घेण्याचा निर्देश द्यावेत, अशी मागणी करत ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर आज ( १४ जुलै ) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. तेव्हा दोन आठवड्यांत आपले उत्तर सादर करावे, अशी नोटीस सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना बजावली आहे. २१ जून २०२२ रोजी शिवसेनेमध्ये फूट पडल्यानंतर शिंदे गटातील आमदारांना अपात्रतेच्या नोटिसा विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी दिल्या होत्या. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयात रंगलेल्या सत्तासंघर्षांवर ११ मे २०२३ रोजी पाच सदस्यांच्या घटनापीठाने ऐतिहासिक निकाल दिला होता. आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभाध्यक्षांनी योग्य कालावधीत घ्यावा, असे निर्देश देत घटनापीठाने दिले होते.

मात्र, हा आदेश देऊन दोन महिने झाल्यानंतरही नार्वेकर यांनी आमदारांच्या पात्रतेसंदर्भात एकही सुनावणी घेतली नसल्याचे प्रभू यांनी याचिकेद्वारे। **पान २ वर**

## चांदणी चौकातील उड्डाणपुलाच्या कामाची पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्याकडून पहाणी



पुणे : पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आज चांदणी चौकातील उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामास भेट देऊन पाहणी केली. उड्डाणपूल प्रकल्पाचे उर्वरित काम गतीने पूर्ण करावे आणि उद्घाटन कार्यक्रमाचे योग्य नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी प्रकल्प संचालक संजय कदम, वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर, माजी नगरसेवक किरण दगडे पाटील, दीपक पोटे, अमोल बालवडकर, माजी नगरसेविका अल्पना वर्पे, आदी उपस्थित होते.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून पुण्यातील चांदणी चौकात उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुला प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून येत्या १२ ऑगस्ट रोजी केंद्रीय भूपृष्ठ मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते लोकार्पण करण्याचे नियोजित आहे. या पार्श्वभूमीवर कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्यादृष्टीने श्री. पाटील यांनी चांदणी चौक येथे भेट दिली. पुण्यातील । **पान २ वर**



**स्नेह भेट : मुरुम येथील कनिष्ठ महाविद्यालय प्राचार्य इंगोले सर यांचे २१ वर्षानंतर भेटण्याचा योग आल. यावेळी जुनी आठवणी व इतर चर्चा झाले यावेळी त्यांना संपादक कमलाकर सोनकांबळे यांच्या हस्ते दैनिक यश सिध्दी न्युज चा अंक भेट देण्यात आले.**

## चिमणी पाडली आता विमाने कधी उडणार ? केतन शहा यांनी उत्तर द्यावे : उमेश साळुंखे

अक्कलकोट/प्रतिनिधी : चिमणी पाडून सोलापूर जिल्ह्यातील कष्टकरी शेतकरी मजूर कामगार यांची घरे उध्वस्त केले आहेत चिमणी पाडून दोन महिने होत येत आहेत अद्यापही विमान उडायचे नाव नाही केतन शहा यांनी चिमणी पाडून सोलापूर जिल्ह्यातील कामगारांचे फार मोठे नुकसान केले आहे, त्यामुळे केतन शहा यांनी गोरगरीब मजूर कष्टकरी कामगार यांची माफी मागावी अन्यथा विमान तरी उडवावे अशी मागणी उद्धव ठाकरे शिवसेनेचे वागदरी विभाग प्रमुख उमेश साळुंखे यांनी केली आहे.

केवळ चिमणी चा बाऊ करून व केवळ काडादी यांना विरोध करण्यासाठी चिमणी चे राजकारण शहा यांनी केले आहे यापुढे किती विमाने सोलापूर च्या विमानतळावरून उडणार आहेत हे आता आम्हाला बघायचे आहे, ? कारण चिमणी पाडून दोन महिने झाले एक ही विमान उडाले नाही मग शहा यांचा हट्ट कशासाठी होता? असा सवाल ही उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे वागदरी विभाग प्रमुख उमेश साळुंखे यांनी दिला आहे.चिमणी पाडून सोलापूर जिल्ह्यातील कष्टकरी शेतकरी मजूर कामगार यांची घरे उध्वस्त करण्यात आली आहेत, भाजपचे लोक सोलापूर जिल्ह्यातील उद्योग दुसरीकडे जाण्यासाठी अगोदर चे उद्योग बंद पाडत आहेत असा आरोप बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे वागदरी विभाग प्रमुख उमेश साळुंखे यांनी केला आहे



श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्या ची चिमणी पाडून सोलापूर च्या विकास थांबवण्यासाठी डाव खेळला जात आहे असेही साळुंखे यांनी म्हटले आहे. महाराष्ट्र राज्यातील आत्ताच्या सत्ताधाऱ्यांनी सोलापूर जिल्ह्यात एकही मोठा उद्योग आणलेला नाही हे मोठे अपयश आहे, भूसंपादन झालेल्या बोरामणी विमानतळाचा विकास साधला असता तर सिध्देश्वरची चिमणी पाडण्याचा प्रश्नच उदभवला नसता. आणि शेतकर्यांसाठी पवित्र मंदिर म्हणून मोठ्या दिमाखात उभी असलेल्या या कारखान्याची चिमणी पाडण्याची दुर्दैवी वेळ आली नसती. असेही विभाग प्रमुख उमेश साळुंखे यांनी म्हटले आहे,

सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी पाडून प्रशासनाने सोलापूरचे एक प्रकारे मोठे नुकसान केलेले आहे. हजारो सभासद असलेले शेतकरी आणि शेकडो कामगारची गुजराण या कारखान्यावर अवलंबून होती या सर्वांना त्यांनी देशोधडीला लावले आहेत, . या साऱ्यांना सत्ताधाऱ्यांनी पराभुत केले आहेत, आणि आपला स्वार्थी हेतु साध्य करुन घेतला आहे. वास्तविक पाहता सोलापूरात कोणताही मोठा उद्योग नाही की कारखानदारीही नाही, तरुणांच्या हाताला काम नाही, काम नसलेल्या हातांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागलेली आहे, तरुण गुंडगिरी आणि व्यासनाधीनतेकडे वळू लागलेले आहेत. अशा। **पान २ वर**

## * सुविचार *

छटाकभर प्रेम शेरभर ज्ञानापेक्षा वरचढ असते.- जॉन वेरली

# संपादकीय

## त्या नेत्यांवर कडक कारवाई व्हावी

आमदार गीता जैन यांनी ठेक्यावर नेमलेल्या कनिष्ठ अभियंत्यास सार्वजनिकरीत्या कानफटात मारली. एका बिल्डरच्या तक्रारीवरून पावसाळ्यात राहते घर तोडण्याची कारवाई करण्यात आली. मीरा-भाईंदर महापालिकेचे प्रभाग अधिकारी सचिन बच्छाव यांच्याच आदेशावरून संबंधित अभियंत्याने हे काम केले होते; परंतु, त्याबद्दल मार त्यालाच खावा लागला. त्याबद्दल त्याने आवाज उठवून संबंधित आमदाराला अद्दल घडवण्याची आवश्यकता होती. मात्र, प्रत्यक्षात या अभियंत्याने पोलिसात केलेली तक्रार मागे घेतली असून उलट जैन यांची भेट घेऊन आपल्या भावाच्या लग्नाचे आमंत्रणही त्यांना दिले आहे. जैन या भाजप समर्थक आमदार असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची जाहीरपणे कानउघाडणी करणे आवश्यक होते. पण तसे घडलेले नाही. दुसरीकडे ठाकरे गटाच्या वांद्रे येथील शाखेचे पाडकाम करण्याच्या कारवाईत सहभागी असलेल्या सहायक अभियंत्यास शिवसैनिकांनी मारहाण केली. या अभियंत्याने शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो असलेल्या फलकावरदेखील हातोडा चालवला, असा आरोप ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत तसेच माजी परिवहनमंत्री अनिल परब यांनी केला. राज्यात शिंदे-फडणवीस सरकार असल्यामुळे त्यांच्या पक्षाच्या आमदारांनी काहीही केले तरी ते खपवून घेतले जाते आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांवर मात्र तत्काळ कारवाई केली जात आहे. यापूर्वी महाविकास आघाडीच्या किंवा लोकशाही आघाडीच्या कार्यकाळातही असा पक्षपात होत होता. अनेकदा पालिका वा शासकीय कर्मचारी नागरिकांशी दुर्वर्तन करतात व पैसे खातात, अशांबाबत राजकीय पक्षाने हिंसक नव्हे, पण आक्रमक पवित्रा धारण करणे हे योग्यच असते, परंतु कायदा हातात घेण्याचा कोणालाही अधिकार नसतो. मात्र, चॅनेलवाल्यांच्या साक्षीने प्रदर्शन करण्याची अनेक नेत्यांना सवय असते. मविआ सरकार असताना केंद्रीयमंत्री नारायण राणे यांनी रायगड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या दुर्घटना स्थळाला भेट दिली. तेव्हा तेथील ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्यांना दम देताना तुमच्या दिशेने या संतप्त जमावाला सोडू का, अशी भाषाही त्यांनी वापरली होती. त्यांचे चिरंजीव आमदार नितेश राणे यांनी तर कोकणात एका अभियंत्याचे बकोट पकडून, त्याला बांधून मारझोड केली होती. शासन व्यवस्था लोकांप्रती उत्तरदायी बनवण्यासाठी मूलगामी सुधारणा करण्याऐवजी, या प्रकारची सवंग लोकप्रियता मिळवून देणारे उपद्व्याप नेत्यांकडून केले जातात. अशा नेत्यांवर कडक कारवाई होण्याची आवश्यकता आहे.

पान १ वरुन

## चांद्रयान ३ ची..

असेल. क्रायोजेनिक इंजिन चांद्रयानाला १७९ किमी अंतरापर्यंत घेऊन जाईल, तेव्हा त्याचा वेग ३६९६८ किमी प्रति तास असेल. प्रक्षेपणाच्या १०८ सेकंदांनंतर रॉकेटचं द्रव इंजिन ४५ किमी उंचीवर सुरू होईल. त्यावेळी रॉकेटचा वेग ताशी ६४३७ किमी असेल. आकाशात ६२ किमी उंचीवर गेल्यावर दोन्ही बूस्टर रॉकेटपासून वेगळे होतील आणि रॉकेटचा वेग ताशी ७ हजार किमी होईल.

भारताच्या 'चांद्रयान-३' या महत्त्वाकांक्षी मिशनने आज आकाशात यशस्वी उड्डाण केलं आणि देशवासियांचा ऊर उभिमानाने भरून आला. आजचा दिवस हा भारतीय अंतराळ इतिहासातील सोनेरी दिवस असून भारतीयांच्या आशा आणि स्वप्नांची झेप असल्याची प्रतिक्रिया पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. तर हा देशाच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांनी प्रतिक्रिया दिली. अमेरिका, रशिया आणि चीननंतर आता चंद्रावर यान उतरवणारा भारत हा जगातील चौथा देश ठरला आहे. या मोहिमेसाठी भारताने तब्बल ६१५ कोटी रुपये खर्च केलेत. चांद्रयान-३ अंतराळयान २३ ऑगस्ट रोजी चंद्राच्या पृष्ठभागावर उतरण्याची अपेक्षा आहे. चांद्रयान-३ ने ४० दिवसांचा प्रवास पूर्ण केल्यानंतर विक्रम लँडरच्या साहाय्याने प्रज्ञान रोव्हर चंद्राच्या दक्षिण धुव्रावर उतरेल.

अंतराळ संशोधनातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणून भारताने चांद्रयान-३ चे यशस्वी प्रक्षेपण केले. या यशानंतर इस्त्रोचे अभिनंदन. टीममधील प्रत्येकजण ज्यांनी यासाठी अथक परिश्रम घेतले त्यांचे अभिनंदन. हे अंतराळ विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीसाठी देशाची अटल वचनबद्धता दर्शवते. चंद्र मोहिमेच्या यशस्वीतेसाठी माझ्या शुभेच्छा.

## राज्यात शिक्षक भरतीचा जीआर..

भार येत असल्याचं चित्र सध्या आहे. त्यामुळे राज्यात शिक्षक भरती होणं हे महत्वाचं मानलं जात आहे.

राज्यात शिंदे - फडणवीसांचं सरकार आल्यानंतर शिक्षण विभागाकडून शिक्षक भरतीच्या अनेक घोषणा करण्यात आल्या होत्या. नवीन शैक्षणिक वर्षात शिक्षक भरती करण्यात येईल असं देखील मंत्री दीपक केसरकर यांनी म्हटलं होतं. तसेच आधार वेरिफिकेशनचं काम झाल्यानंतर राज्यात शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ताबडतोब भरती करण्यात येईल असं देखील त्यांनी म्हटलं होतं. मात्र प्रत्यक्षात शिक्षक भरतीसाठी कोणतीही हालचाल होत नसल्याचं चित्र होतं. पण आता करण्यात आलेल्या घोषणेनंतर आता तरी या शिक्षक भरतीला वेग येईल अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

## चिमणी पाडली आता विमाने

परिस्थितीत चालू कारखान्याची चिमणी पाडून राजकारण खेळले गेले आहे चिमणी पाडून शेतकरी कष्टकरी मजूर कामगार यांच्या चुली बंद पाडल्या आहेत याचा बदला आम्ही जरूर घेऊ असेही साळुंखे म्हणाले.

## राजकीय नेत्यांचे सामाजिक स्थान काय..?

सध्याचे राजकारण पाहीले तर राजकीय नेते आणि लोकप्रतिनिधी यांनी प्रंचड पैसा, मंत्रीपद मिळवले असतील, पैशासाठी, मंत्रीपदासाठी लोकशाहीची व जनतेच्या मताची हत्या करून राजकीय विरोधक एका ताटात बसुन खाताना राजकिय नेत्यांचे सामाजिक स्थान काय असा प्रश्न उपस्थित केला आणि सत्य परिस्थिती बघितली तर राजकीय नेत्यां बद्दल जनतेला आपुलकी, प्रेम, जिव्हाळा कोणत्याही नेत्यांविषयी राहला नाही असे दिसून येते. स्वार्थासाठी राजकारणाची घसरती पातळी, जनकल्याणाचे मुद्दे व सामाजिक समस्या बाजूला सारुन वैयक्तिक पातळीवर केले जाणारे राजकारण व वैयक्तिक पातळीवर टीका टिप्पणी केवळ मनोरंजनाचा भाग झाला आहे. प्रस्थापित इलेक्ट्रॉनिक मिडीया जनतेचा आवाज दाखवत जरी नसला तरीही प्रस्थापित इलेक्ट्रॉनिक मीडीयाच्या सोशल मिडीया पेजवर जाऊन मिडीयाने दाखवलेली बातमी न बघता जनतेच्या प्रतिक्रिया बघितल्या तर जनतेच्या मनातील दु:ख, राजकीय नेत्यांबद्दलचा सन्मान व सरकारच्या कृती वर लोकांचे काय मत हे स्पष्ट दिसते. कोणताही लोकप्रतिनिधी हा आपल्या मतदारसंघात सर्वाचा पालक असतो. मतदारसंघातील जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करून जनतेच्या कल्याणाचे काम करून मुलभूत सुविधा जनतेपर्यंत पोहचवण्याचे काम लोक प्रतिनिधी चे असते. लोकप्रतिनिधी हा मालक, राजा नसुन तो जनतेचा सेवक असतो. परंतु जनसेवक हा आपल्या मतदार संघात जाऊन स्वतःच्या मतदार संघातील लोकांसोबत कोणत्याही विषयावर सामुहिक पणे चर्चा करू शकतो का? महत्त्वाचा मुद्दा हा आहे की आजच्या स्वार्थी, लोभी व स्वतः चे घरे भरणाऱ्या लोकप्रतिनिधींना हेच माहिती नाही कि जनतेच्या समस्या जनतेकडून जाणुन घेऊन त्यावर उपाय योजना करावी लागते. लोकप्रतिनिधी च्या कार्यालयात अनेक चकरा मारुनही कामे होत नाहीत ते ।लोकप्रतीनिधी जनतेत जाऊन जनतेसोबत जनतेच्या प्रश्नांवर काय चर्चा करणार? दरवर्षी करोडो रुपयांचा निधी कुठे खर्च केला जातो हे लोकप्रतिनिधी यांनाच माहिती. निवडून आल्यावर जनतेमध्ये न जाणारे लोकप्रतिनिधी अधिवेशनात जनतेच्या नेमक्या काय समस्या मांडत असतील? राजकारणात राजकीय विरोधक पाहिजे असतात परंतू प्रत्येक पक्षाचे व जनतेचे लक्ष जनकल्याण व राष्ट्रहित असायला पाहिजे. परंतु जनकल्याण आणि राष्ट्रहीत बाजूला ठेवून लोकप्रतिनिधी स्वतः चे घरे भरत असुन जनता व देशाला कंगाल करून सोडत आहेत. आज प्रत्येक नागरिक कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या कर्जाने कर्जबाजारी आहे. अनेक लोकांना दैनंदिन जिवन कसे जगावे यांची भ्रांत आहे. गावातील शाळेत छत गळतात, रंगरंगोटी होत नाही, शिक्षकांची संख्या पुर्ण नाही, आरोग्य केंद्राची अवस्था अशी आहे की तेच अतिदक्षता गृहात अँडमीट आहेत, तरुणांना रोजगार नाही, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही, लघू व कुटीर उद्योगाचा निधी लाभार्थ्यांना मिळत नाही. शासकीय कार्यालयात वेळेवर काम होत नाहीत, काम करायचे तर पैशाचे वजन ठेवल्याशिवाय काम पुढे सरकत नाही. दिवसभर शासकीय कार्यालयात जाऊन बसले तर मजूरी पडते आणि कार्यालयात नाही गेले तर एका कागदामुळे काम होणार नाही खंत वाटते. ह्या सगळ्या गोष्टी सर्वमान्य आहेत, यात नवीन असे काहीच नाही. मग प्रश्न हा उरतो की जनता कर्जबाजारी व समस्या ग्रस्त असताना मात्र लोकप्रतिनिधी ची संपती हजारो पटीने कशी वाढते? लोकप्रतिनिचे बंगले, शेत, कारखाने, हॉटेल, पतसंस्था, शिक्षणसंस्था, जवळच्या लोकांना कंत्राट यामध्ये करोडो रूपयाची वाढ घरात महागड्या वस्तू हा पैसा नेमका येतो तरी कुठून? याची चौकशी मात्र होत नाही. आणि जनतेच्या समस्या काही सुटत नाहीत. इतके दिवस भ्रष्टाचार गुप्त होता परंतु आता उघड उघड भ्रष्टाचार करून स्वतः चे घरे भरण्यासाठी विचार, स्वाभिमान गहाण टाकुन केवळ आर्थिक भरभराट व खुर्चीची लालसा यासाठी लोक राजकीय, वैयक्तिक आणि वैचारिक विरोधक असलेल्या लोकांसोबत हातमिळवणी करून जनतेचा पैसा लुटत आहेत. सत्तेत जाण्या अगोदर हाजरो करोडोंच्या भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या नेत्यांना मात्र सत्तेत गेल्यावर स्वच्छ आणि प्रामाणिक केले जाते. जनतेच्या पैशाची लुट करण्यासाठी सर्वच जन एकत्र येऊन लोकशाही ची हत्या होत आहे हे लोकांना जाणवत आहे परंतु नोकरदार वर्ग स्वतः च्या सुखात व्यस्त, मध्यमवर्गीय आपल्या मेहनत करून कुटुंबाला जगवायचे कसे यात त्रस्त आणि बेरोजगार तरुणांचे कोणी ऐकत नाही. याच परिस्थिती चा फायदा लोकप्रतिनिधी घेऊन जनतेच्या समस्या लक्षात न घेता स्वतः च्या भरभराटीवर लक्ष देत आहेत. निधी नाही म्हणून अनेक लोकप्रतीनिधी यांनी अनेक मतदार संघात कामेच केले नाही. परंतु जे म्हणत होते निधी नसल्याने काम होत नाहीत त्या लोकांची वैयक्तिक संपती मात्र हवेच्या गतीने वाढत गेली. निधी नसताना लोकप्रतिनिधी ची संपती कशी वाढते? निधी नसेल, जनतेची कामे होत नसतील, जनता कामे करण्यासाठी टीकाटिप्पणी करते आणि निधीच मिळत नाही म्हणून विनाकारण बदनाम व्हावे लागते म्हणून किती लोकप्रतिनिधी यांनी राजीनामा दिला? स्वतः चे पगार वाढ करताना मतदारसंघात बेरोजगार तरुणांचे काय यावर मात्र एकही लोकप्रतिनिधी बोलत तर तो लोकांचा प्रतिनीधी कसा होईल? राजकीय नेता हा जनतेचा पालक असतो आणि पालकाचा सर्वच जन सन्मान करतात. पालकाकडे हक्काने माणूस गरजेच्या बाबींची मागणी करत असतो. पालक आज नाही पण उद्या त्याची पुर्तता करत असतात. परंतु राजकीय क्षेत्रात पालक वर्गच स्वतः चे घर भरून बाकींच्यांना वाऱ्यावर सोडत असताना जनतेच्या मनात मानसन्मान कसा निर्माण होईल? लाचार होऊन स्वाभिमान विकुन खुशाल कोणत्याही गोटात सामील होऊन स्वतः च्या पिढ्यांना आर्थिक मजबूत करणारे लोकप्रतीनिधी आपल्या मुलांना सामाजिक, मानसिक व नैतिक दृष्टीने मजबूत करू शकतील काय? हा ही सर्वात महत्त्वाचा प्रश्न असतो. निवडून मध्ये जनतेच्या पाया पडून मताची भिक मागुन मी तुमच्या च साठी काम करेल असे बोलणारे प्रतिनिधी स्वतः च्या स्वाभिमानाचा व जनतेच्या मताचा लिलाव जाहीर पणे करून ते लाचार आणि गुलाम किती आहेत याची जाणीव करून देतात. जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी जनतेमध्ये कधीच न जाणारे लोक आर्थिक मिळकती साठी किंवा मोरक्या म्हणतो म्हणून मोरक्याचा गुलाम म्हणून दुसऱ्या गोटात जातो तेव्हाच लक्षात येते या प्रतिनिधी याने करोडो चा भ्रष्टाचार केला आहे. म्हणून लोकप्रतिनिधी बद्दल जनतेच्या मनात आदराचे सन्मानाचे स्थान राहीले नाही. आणि आज कोणताही लोकप्रतिनिधी असा नाही जो एकटा मतदार संघात जाऊन शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा, शेतकरी प्रश्न, तरुणांचे, महिलांचे, बालकामगारांचे प्रश्न यावर मनमोकळी चर्चा करू शकत नाहीत. कारण त्यांना माहिती आहे जनतेत जाऊन या विषयावर चर्चा करणे म्हणजे आपण आपल्याच हाताने बेइज्जती करून घेणे आहे. याची जाणीवही प्रतिनिधींना आहे. किंवा आपल्या समस्या आपण आपल्या लोकप्रतीनिधींना आपला माणुस म्हणून सांगाव्या म्हणजे तात्काळ दुर होतील अशी मानसिकता ही लोकांची राहली नाही. कारण लोकांना माहिती आहे आपल्या समस्यावर उपाययोजना होणे आणि प्रभावी होणे या स्वार्थी आणि असंवेदनशील राजकारणात शक्य नाही. प्रतिनिधी च्या कार्यालयाभोवती चहा साठी फिरणारे आणि प्रतिनिधी नावाने ओळखतो म्हणून त्यांना चांगले मानणारेच लोक लोकप्रतिनिधींना थोडाफार मान सन्मान देत असतील. जनतेच्या मनातील राग व लोकप्रतिनिधी विषयी मत खुप गंभीर आहेत. याचाच अर्थ लोकप्रतिनिधींनी राजकारणात जाऊन स्वतः ची आर्थिक भरभराट करून घेतली आपल्या पिढ्यांना जनतेचा लुटलेला पैसा कमाईच्या स्वरुपात देतील परंतु सामाजिक स्थान आणि सन्मान मात्र पैशाने विकत घेता येत. तो आपल्या कर्माने, स्वभावाने व उदार मनाने मिळवावा लागतो. आणि यासाठी मनामध्ये प्रामाणिक पणा व मानुसकी पाहिजे आणि तीच आज राजकारणातून बाहेर पडली असल्याने राजकीय नेत्यांचे सामाजिक स्थान हे केवळ मनोरंजन, तिरस्कार व भ्रष्टाचार या विषयाचे स्थान बनले आहे म्हणून नागरिकांना जागृत होऊन लोकशाही वाचवणे आवश्यक आहे. लोकांच्या मताची किंमत शुन्य केली आहे. इव्हिएम च्या माध्यमातून सरकारला अपेक्षित निवडून निकाल तयार केला जातो म्हणून जनतेच्या समस्येवर लक्ष दिले जात नाही. आणि राजकीय नेते इव्हिएम ला ही विरोध करत नाहीत. अनेक प्रगत देशात ईव्हीएम बंद आहे. आणि भारतात अनेक घोटाळे झाल्याचे लक्षात येऊनही सुरू आहे याचाच अर्थ इव्हिएम मधून सर्वांना काहीना काही मिळते म्हणून कोणी बोलत नाही. जागृत नागरिकांनी ईव्हीएम ला विरोध करून बॅलटपेपर वर निवडणुक घेण्याचा अट्टाहास धरला तर लोकांच्या मताला पुन्हा किंमत येईल. व लोकशाही जिवंत ठेवण्याचा हा प्रयत्न होईल.

**विनोद पंजाबराव सदावर्ते, समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर मोबा: ९१३०९७९३००**

भविष्यात होटगी रोडच्या विमानतळावरून मोठे विमाने येऊ शकतील इतकेही मोठे हे विमानतळ नाही. भविष्यात याचा किती फायदा होणार आहे. या सर्व गोष्टीचा विचार करून बोरामणी विमानतळाचा विकास करणे अपेक्षित असताना शेतकर्यांच्या मंदिराचा कळस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिद्धेश्वर चिमणी पाडण्याचा घाट प्रशासन आणि राजकारण्यांनी घातला, हे जनतेच्या आणि विकासाच्या दृष्टीने अंत्यत घातक आणि धोकादायक व नुकसान कारक ठरले आहे.

## शिवछत्रपती राज्य क्रीडा

तीन वर्षांचे क्रीडा पुरस्कार आज जाहीर केले. सन २०१९-२० चा शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव पुरस्कार ठाण्याचे श्रीकांत शरदचंद्र वाड यांना, तर २०२१-२२ चा जीवन गौरव पुरस्कार मुंबईचे आदिल जहांगिर सुमारीवाला यांना जाहीर करण्यात आला आहे. तीन वर्षांतील एकूण ११६ पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

## १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत

निदर्शनास आणून दिले आहे. सुनावणी घेण्यासंदर्भात १५ मे, २३ मे व २ जून अशी तीन वेळा विनंती केली होती. पण, विधानसभाध्यक्षांनी या विनंतीची दखल घेतली नाही. त्यामुळे आता सर्वोच्च न्यायालयानेच यासंदर्भात निर्देश द्यावेत, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती. यावर आज ( १४ जुलै ) सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. दोन आठवड्यांत विधानसभा अध्यक्षांनी आपले उत्तर सादर करावे, अशी नोटीस बजावण्यात येत आहे, असं सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी म्हटलं.

नबाम रेबिया प्रकरणात विधानसभा अध्यक्षांचा निवाडा निष्पक्ष असावा, असे न्यायालयाने म्हटले होते. तर २०२० मधील कैशाम मेघचंद्रसिंह विरुद्ध मणिपूर विधानसभा अध्यक्ष या खटल्यात अपात्रतेची याचिका दाखल झाल्यापासून साधारणत: तीन महिन्यांमध्ये निकाल दिला जावा, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते. प्रभू यांच्या याचिकेत या पूर्वीच्या निवाड्यांचे संदर्भ देण्यात देण्यात आले होते. त्याआधारे नार्वेकर यांना तातडीने सुनावणी व निकालाचे आदेश देण्याची मागणी याचिकेत करण्यात आली होती.

## चांदणी चौकातील उड्डाणपुलाच्या

चांदणी चौकातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून चांदणी चौकात उड्डाणपूल, सेवा रस्ता उभारण्यात येत असून, सध्या या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. लवकरच सर्व काम पूर्ण करण्याचे नियोजन असल्याची माहिती प्रकल्प संचालक संजय कदम यांनी यावेळी पालकमंत्री श्री. पाटील यांना दिली. पुणेकरांसाठी चांदणी चौक हा अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे त्याचे उर्वरित काम जलदगतीने पूर्ण करावे. त्यासोबतच कामात कोणतीही त्रुटी राहू नये, याची खबरदारी घ्यावी. पावसाची शक्यता लक्षात घेऊन, उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करावे, अशा सूचना यावेळी पालकमंत्री पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

## फकीरा दलाच्यावतीने दत्तक विद्यार्थ्यांसह अन्य विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

अक्कलकोट/प्रतिनिधीः सा.अण्णाभाऊ साठेनगर, माणिक पेठ, अक्कलकोट येथे फकीरा दलाच्या वतीने दत्तक घेतलेल्या विद्यार्थ्यांसह अन्य विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, बॅग, शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत जयघोषाने करण्यात आली. यावेळी जेष्ठ समाजसेवक मातंग समाजअध्यक्ष निवृत्ती पारखे, आरपीआयचे शहर संघटक अंबादास शिंगे फकीरा दल शहर उपप्रमुख हर्षवर्धन देडे, रेश्मापारखेदेडे, आरती पारखे आदि सह पालक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आयोजक जयभाऊ पारखे यांनी मानले.



## श्री.एस एस शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय वागदरी येथे नशा मुक्त भारत अभियान

सोलापूर/प्रतिनिधीः डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट (बार्टी) चे अक्कलकोट तालुक्याचे समतादुत नालंदा शिंदे यांच्या पुढाकाराने घेण्यात आले यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अमली पदार्थ विरोधी प्रतिज्ञा घेऊन मार्गदर्शन करताना ,जेष्ठ प्रा. चंद्रकांत पोतदार म्हणाले की वाईट नशा ही झाडाला लागलेली किडेप्रमाणे असतो एखाद्या चांगल्या झाडला कीड लागली की पूर्ण झाड उध्वस्त केल्याशिवाय सोडत नाही तसाच माणसाचे नाजूक शरीराला जर दारू, सीगारेट सारख्या वाईट व्यसन जडले की अल्पावधीतच कर्करोग सारख्या महाभयंकर रोग (किड) लागल्याने आयुष्य संपवतो. तसेच बार्टी चे नालंदा चंदनशिवेने सुध्दा सांगितले की नशा ही दोन प्रकारचे असतात




चांगले आणि वाईट चांगले म्हणजे शारीरिक ,मानसिक सशक्तीकरण करणे होय वाईट म्हणजे सदृढ शरीराला अमली पदार्थांच्या आहारी जाऊन स्वतचे शरीर व आयुष स्वतः संपून घेणे होय . तसेच महाविद्यालय चे प्राचार्य अनिल देशमुख यांनी सुद्धा म्हणाले की आपण ४ शब्द कमी शिका परंतु शिस्त, निर्व्यासनी , काळाची गरज आहे वाईट सवई ला आपण मूठमाती देऊन वाटचाल केली पाहिजे अशा शब्दात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यावेळी महाविद्यालयचे विभागप्रमुख प्रा. संतोष हत्ते, प्रा. चंद्रकांत पोतदार , प्रा. शशांक खिलारी , प्रा. बसवंत गायकवाड , सौ.प्रा मोरे , प्रा. लांडगे, प्रा. अनिल दरेकर व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपास्थित होते सूत्रसंचालन प्रा.कांबळे व आभारप्रदर्शन प्रा. मोरे यांनी करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# जिल्ह्यातील सर्व बँकांनी कृषीसह प्राधान्य क्षेत्राला उद्दिष्टाप्रमाणे कर्ज पुरवठा केला पाहिजे : जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर

## बँकाकडे येणारा लहानात लहान शेतकरी ही पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी

***बँकांनी शैक्षणिक कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी स्वत:हून प्रयत्न करावेत *केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची पतपुरवठा करण्याबाबतची प्रकरणे बँकांनी त्वरित मार्गी लावावीत *जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वार्षिक पतपुरवठा धोरण पुस्तिका व आरसिटी वार्षिक अहवाल पुस्तिकेचे प्रकाशन *सोलापूर जिल्ह्यासाठी वार्षिक १५ हजार ५५० कोटीच्या वित्तपुरवठा आराखडा जाहीर, यामध्ये प्राधान्य क्षेत्राला १० * हजार ५५० कोटी वित्त पुरवठा करण्यात येणार**



सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा वार्षिक पतपुरवठा धोरण २०२३-२४ अंतर्गत सोलापूर जिल्ह्यासाठी एकूण १५ हजार ५५० कोटीचा पतपुरवठा आराखडा जाहीर करण्यात येत आहे. या अंतर्गत प्राधान्य क्षेत्राला दहा हजार पाचशे पन्नास कोटी पतपुरवठा करण्यात येणार असून कृषी क्षेत्राला ७ हजार २५० कोटी रुपये पतपुरवठा करण्याचे उद्दिष्ट जिल्ह्यातील बँकांना देण्यात आलेले आहे. तरी जिल्ह्यातील सर्व बँकांनी कृषी क्षेत्रा सह दिलेल्या उद्दिष्टप्रमाणे सर्व क्षेत्राना पत पुरवठा केला पाहिजे, असे निर्देश जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय सल्लागार समितीच्या (DLCC) त्रैमासिक बैठकीत जिल्हाधिकारी शंभरकर बोलत होते. यावेळी आरबीआयचे डीएलओ राहुल कुमार, बँक ऑफ इंडियाचे झोनल मॅनेजर चंद्रशेखर मंत्री, नाबार्डचे जिल्हा समन्वयक नितीन शेळके, जिल्हा बँक व्यवस्थापक प्रशांत नाशिककर, आरसिटी चे संचालक दीपक वाडेवाले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष कोलते यांच्यासह सर्व बँकांचे संबंधित प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी शंभरकर म्हणाले की पीक कर्जाच्या अनुषंगाने लहान लहान शेतकऱ्यांना बँकांकडून पिक कर्ज देण्यास टाळाटाळ केली जाते अशा तक्रारी प्रशासनाला प्राप्त होत असतात. तरी जिल्ह्यातील सर्व बँकांनी पीक कर्ज मागणीसाठी येणारा लहानात लहान व गरजू शेतकऱ्याला तात्काळ पिक कर्ज पुरवठा केला पाहिजे. पतधोणातील उद्दिष्ट प्रमाणे संख्यात्मक उद्दिष्ट पूर्ण न करता लहानात लहान शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत योग्य ती दक्षता बँकांकडून घेण्यात यावी असेही निर्देश त्यांनी दिले.

मागील वर्षीच्या जिल्हा वार्षिक पद धोरणानुसार सर्व बँकांनी गृह कर्ज व शैक्षणिक कर्ज वगळता दिलेले उद्दिष्ट साध्य केल्याचे दिसून येते. परंतु बँकांनी शैक्षणिक कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. बँकांकडे शैक्षणिक कर्ज मागण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांना सर्व विहित नियमावलीची माहिती देऊन ती त्यांच्याकडून पूर्ण करून अशी प्रकरणे मंजूर करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी शंभरकर यांनी सांगितले. त्याप्रमाणेच बँकांनी राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनाच्या प्रकरणात विहित पद्धतीने परंतु वेळेवर कर्ज पुरवठा करावा असे निर्देशही त्यांनी दिले.

जिल्ह्यातील सर्व महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांनी शासनाकडून त्यांना आलेल्या उद्दिष्ट प्रमाणे संबंधित लाभार्थ्यांकडून परिपूर्ण अर्ज भरून घेऊन कर्ज मागणीचे प्रस्ताव बँकाकडे पाठवावेत. बँकांनी विहित पद्धतीने व परिपूर्ण असलेले प्रस्ताव त्वरित मंजूर करावेत. तसेच जे प्रस्ताव मंजूर करण्यासारखे नाहीत ते प्रस्ताव तात्काळ कारणासह नामंजूर करून संबंधित महामंडळांना कळवावे. व महामंडळांनी त्यातील त्रुटी दूर करून ते प्रस्ताव पुन्हा बँकाकडे सादर करावेत, अशा सूचना जिल्हाधिकारी शंभरकर यांनी दिल्या.

जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक नाशिककर यांनी जिल्हा वार्षिक पद धोरण २०२२ २३ अंतर्गत देण्यात आलेले ८ हजार ८० कोटीचे वित्तपुरवठाचे उद्दिष्ट हे ८ हजार २६० कोटी वित्तपुरवठा करून पूर्ण करण्यात आल्याची माहिती बैठकीत दिली. १०२% उद्दिष्ट पूर्तता झालेली असून यावर्षी पंधरा हजार पाचशे पन्नास कोटीचे वित्त पुरवठा करण्याचे बँकांना उद्दिष्ट देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

मागील वर्षी पीक कर्ज १०३%, कृषी १३३%, गृह कर्ज ८० टक्के व शैक्षणिक कर्ज २७ टक्के वाटप करण्यात आलेले आहे. तर जिल्ह्यातील बँकांनी बचत गटांना २८० कोटीचे कर्ज वाटप केले असून ते उद्दिष्टापेक्षा खूप अधिक असल्याचे सांगितले. तसेच प्राधान्य क्षेत्राला १३९ टक्के कर्ज वाटप झाल्याची माहिती ही श्री. नाशिककर यांनी यावेळी दिली. तर यावर्षीच्या वार्षिक पत धोरण आराखड्यानुसार २ हजार ३७९ कोटी खरीप तर १ हजार ८७१ रब्बी पीक कर्ज वाटप करण्यात येणार आहे. कृषी मुदत कर्जासाठी ३ हजार कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. प्राधान्य क्षेत्राला १० हजार ५५० कोटी तर अप्राधान्य क्षेत्राला ५ हजार कोटी असे एकूण १५ हजार ५५० कोटीचा वार्षिक पत पुरवठा आराखडा पुण्याचे श्री. नाशिककर यांनी सांगितले. यावेळी आरसिटी चे संचालक दीपक वाडेवाले यांनी आरसिटी मार्फत वर्षभरात घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती बैठकीत सादर केली. यावेळी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या हस्ते जिल्हा वार्षिक पतपुरवठा धोरण पुस्तिका व आरसिटी वार्षिक अहवाल पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# सरकारी कामात अडथळा केल्याच्या आरोपातून सुहास कांबळे यांची निर्दोष मुक्तता



बार्शी/प्रतिनिधीः येथील वाहतूक पोलिसांच्या कामात अडथळा करत खंडणी मागतली या प्रकरणात संशयित आरोपी सुहास कांबळे यास साक्षीदारांच्या साक्ष मधील विसंगता आणि सबळ पुराव्या अभावी बार्शी येथील मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. एल एस चव्हाण यांनी सदर आरोपातून निर्दोष मुक्त केले.

बार्शी येथील पोस्ट चौक येथे दिनांक २ एप्रिल २०१७ रोजी फिर्यादी विलास विठ्ठलराव राठोड वाहतुक केसेस करीत असताना सुमारास पोस्ट चौक बार्शी येथे सुहास कांबळे मोटार सायकलवरून पोस्ट चौकात येवुन त्यांनी मी पत्रकार आहे तुम्ही मला महिन्याला तीन हजार रुपये हप्ता म्हणुन दया, नाहीतर मी तुमचे फोटो काढून तुमच्या एस.पी.ला पाठवतो व पेपरला देतो असे म्हणाला, आणि तुम्ही बार्शी शहरातच वाहानांच्या केसेस का करता, तुम्ही बार्शी शहराच्या बाहेर जाऊन केसेस करा असे म्हणुन माझे अंगावर धावून येऊन तुमचे बघून घेतो अशी धमकी देवुन, सरकारी काम करीत असताना त्याने सरकारी कामात अडथळा निर्माण केला अशी फिर्याद दिली होती. यात भा.द.वि. कलम ३५३, ३८५, ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, यात पोलिसांनी तपास करून दोषारोपपत्र दाखल केले होते. यात सरकारी पक्षाकडून एकूण सहा साक्षीदार तपासले, फिर्यादी व तपास अधिकारी हे त्यांचे म्हणण्यावर ठाम राहिले. साक्षीदारांच्या साक्ष देण्यातील विसंगत पणा, तसेच शिक्षा देण्याइतपत कोणताही पुरावा सादर करण्यास किंवा सिद्ध करण्यास सरकारी पक्ष असमर्थ ठरले.

सदर गुह्यातील आरोपी विरुद्ध सबळ पुरावा नसल्याने मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. एल एस चव्हाण यांनी सुहास कांबळे यांची सदरच्या गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता केली.

यात आरोपीच्या वतीने ड. प्रशांत एडके, ड. समाधान सुरवसे यांनी काम पाहिले. साप्ताहिक विचारांचा अंकुश या वृत्तपत्रातून बार्शी शहर आणि तालुक्यातील बेकायदेशीर आहे आणि वाहतूक पोलिसांचे गैरप्रकार याबाबत वृत्त प्रकाशित केल्याने व विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील यांच्या जनसंवाद बैठकीमध्ये अवैध व्यवसाय बद्दल तक्रार मांडली या गोष्टींचा राग मनात धरून बार्शी शहर पोलिसांनी तत्कालीन पोलीस निरीक्षक गजेंद्र मनसावले यांच्या देखरेखीखाली जाणीवपूर्वक खोटा गुन्हा दाखल केला होता.

# अधिक मासानिमित्त वटवृक्ष मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन : महेश इंगळे



अक्कलकोट/प्रतिनिधी : यंदाच्या अधिक श्रावण मासानिमित्त येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानच्या वतीने वटवृक्ष मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांनी दिली. अधिक मासात दिनांक १८ जुलै ते २० जुलै २०२३ अखेर सोलापूर येथील वारकरी सांप्रदायचे ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराज यांची ३ दिवसीय भागवत कथा, दिनांक १७ जुलै ते २३ जुलै अखेर बदलापूर येथील स्वामीभक्त ठाकूर मामा व सहकाऱ्यांचे भक्तनिवास हॉलमध्ये श्री गुरुलिलामृत पारायण सप्ताह, दिनांक २२ जुलै रोजी मुंबई येथील डॉ. प्रफुल्ल विजयकर, डॉ.अपर्णा सामळ, सहकाऱ्यांचे देवस्थानच्या गाणगापूर रोडवरील श्री स्वामी समर्थ रुग्णालयात २० वर्षाखालील मतिमंद गतिमंद मुलांसाठी होप फॉर होपलेस होमिओपॅथिक शिबिर, दिनांक २५ जुलै ते २७ जुलै अखेर श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात बदलापूर येथील प्रसाद गुरुजी व सहकाऱ्यांचा दत्तयाग, दिनांक २८ जुलै ते १ ऑगस्ट अखेर ह.भ.प.किशोर महाराज शिवणीकर यांची वटवृक्ष मंदिरात संगीत संत चरित्र कथा इत्यादी धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहेत. याप्रसंगी बोलताना मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी यंदा दिनांक

१८ जुलैपासून अधिक श्रावण महिना सुरु होत आहे. खरे तर अधिक महीना ही अगदी साधी खगोलीय तरतूद आहे. इंग्रजी सौर वर्ष हे ३६५ दिवसांचे तर आपल्या हिंदू संस्कृतीतील चांद्रवर्ष ३५४ दिवसांचे असते. दरवर्षी हा फरक ११ दिवसांचा असतो. दर तीन वर्षांनी हा फरक ३३ दिवसांचा होत असल्याने तो दूर करण्यासाठी १ अधिक मास येतो. तीन वर्षांनी येणाऱ्या या अधिक महिन्याचे महत्व, व्रते, दानधर्म, देवदर्शन करुन आपण मोलाचे बनवून वृद्धींगत करतोच. भाविकांनी व्रत, दानधर्म, स्वामी दर्शन यासह या धार्मिक कार्यक्रमांचाही लाभ घ्यावा असे आवाहन महेश इंगळे यांनी याप्रसंगी केले आहे.

# विठुराया संत सावता माळी यांच्या भेटीला



फुलचिंचोली/प्रतिनिधी :धन्य ते अरण! रत्नाची खाण!! जन्मला तो निधान! सावता सागर! प्रेमाचे आगर!! या अभंगाप्रमाणे संत सावता माळी यांची कर्मभूमी असणाऱ्या माढा तालुक्यातील अरण या गावची आख्यायिका आहे.कामातच देव मानणाऱ्या कांदा, मुळा, भाजी आवघी विठाई माझी अशी ओळख असणाऱ्या संत सावता माळी यांच्या भेटीसाठी कानड्या विठुरायाच्या पालखीचे प्रस्तान झाले.


आषाढी एकादशीच्या अगोदर संताच्या पालख्या पंढरपूरकडे प्रस्थान होतात. परंतु अपवाद फक्त संत शिरोमणी सावता माळीयांची पालखी येत नाही तर आषाढी वारी झाल्यावर पांडुरंगाची पालखी अरण येथे संत सावता माळी यांच्या हे विशेष म्हणावे लागेल. आज सकाळी काशी कापडी समाजाच्या मठातून हजारो भाविक भक्तांच्या वारकऱ्यांच्या उपस्थितीत फुलांनी सजविलेल्या पालखीत पादुका ठेवून प्रस्थान करण्यात आले.

विठ्ठल मंदिरातुन मानकऱ्यांनी पादुका डोक्यावर घेऊन, विधिवत पूजा करण्यात आली. या पादुकांमध्ये विठलाचा वास येतो असे सांगितले जाते.

यानंतर पादुका पालखीत ठेवून अरण कडे प्रस्थान झाले. तीन दिवसानंतर विठ्ठलाची पालखी तिथे पोहोचून संत सावता माळी यांच्या पुण्यतिथी सोहळ्यास उपस्थित राहून काल्याचा कार्यक्रम झाल्यानंतर पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान होते. जगाचा देव असणारा पांडुरंग भक्ताच्या म्हणजे संत सावता माळी यांच्या भेटीस जातो यामुळे या सोहळ्यास अत्यंत महत्त्व आहे.

यावेळी सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याणराव आखाडे यांच्यासह काशी कापडी समाजाचे मानकरी नागेश गंगेकर, अरण ट्रस्टचे सचिव ऍड. विजय शिंदे, सावता परिषदेचे मुख्य प्रदेश संघटक संतोष राजगुरू, प्रदेश संघटक सौ.साधना राऊत, , माढा तालुकाध्यक्ष डॉ.भारत कुबेर, युवा आघाडी जिल्हाध्यक्ष सयाजी बनसोडे, काँग्रेसचे संग्राम जाधव,पत्रकार सावता जाधव सोहळा प्रमुख मोहन कुलकर्णी, पुजारी विजय देशमुख गोपीनाथ कुलकर्णी, काशी कपडे समाजाचे अध्यक्ष श्री गंगेकर व त्यांचा समाज, रथाचे चालक पंडित सुर्वे, रघुनाथ जाडकर, बाबा सोलंकर श्रीधर सोलंकर विशाल पिंगळे विवेक गंगीकर सोमनाथ टमटम राहुल गंगेकर आदीसह भाविकभक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विदेशी बंद्यांनाही व्हिडीओ कॉलिंग सुविधा, कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता




पुणे : महाराष्ट्र कारागृह व सुधारसेवा विभागाने राज्यातील कारागृहांमध्ये असलेल्या पाकिस्तानी, बांग्लादेशी व अतिरेकी कारवायातील बंदी वगळता इतर विदेशी बंद्यांना कुटुंबियांशी व नातेवाईकांशी संपर्क साधण्याकरीता ई-प्रिझन प्रणालीद्वारे व्हिडीओ कॉलिंग सुविधा उपलब्ध करून द्यावी असे निर्देश कारागृह महानिरीक्षक अमिताभ गुप्ता राज्यातील सर्व कारागृह प्रमुखांना दिले आहेत. मानवतेच्या दृष्टीकोनातून सर्व बंद्यांसाठी ही सुविधा ४ जुलै २०२३ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. राज्यातील विविध कारागृहात सध्या ६३७ बंदी दाखल आहेत. यामध्ये मुंबई,नवी मुंबई व इतर मेट्रोपॉलिटन शहरातील कारागृहात विदेशी बंद्यांचे प्रमाण अधिक आहे. कारागृहात नायजेरियन, बांग्लादेश, केनिया, कोलंबिया, इराण, इराक, ब्रिटन, ग्रीस, गिनी, घाना, ब्राझील, थायलंड, युगांडा, चीन, पाकिस्तान, नेपाळ इत्यादी देशांचे नागरिक विविध गुन्ह्यांमध्ये अटक होऊन दाखल आहेत.

विदेशी बंद्यांचे नातेवाईक अथवा वकील प्रत्यक्ष भेटून मुलाखत घेण्यासाठी येवू शकत नसल्याने विदेशी बंद्यांना कायदेशीर मदत मिळण्यास व कारागृहातून सुटका होण्यास अडचणी निर्माण होतात. त्यामुळे विदेशी बंद्यांमध्ये नैराश्य वाढू लागते.

कारागृह प्रशासनाला या बंद्यांवर सतत निगरानी ठेवावी लागते. ही सुविधा विदेशी बंद्यांना उपलब्ध करून दिल्याने त्यांना कायदेशीर मदत लवकर मिळेल व कारागृहातून लवकर सुटण्यास मदत होईल. त्यामुळे कारागृहातील बंद्यांची गर्दी काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.ही सुविधा नुकतीच प्रथमतः ऑर्थर रोड कारागृहात बंदिस्त असलेला नायजेरियन विदेशी बंदी व त्याचे नातेवाईक यांनी सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता करून केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शनाखाली एनआयसी या संस्थेने विकसित केलेल्या ई-प्रिझन प्रणालीद्वारे बंदी व नातेवाईक मुलाखत व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे घेतली. ही सुविधा यशस्वीपणे विदेशी बंद्यांना लागू करण्याची जबाबदारी कारागृहाचे विशेष पोलीस महानिरीक्षक, डॉ जालिंदर सुपेकर यांच्याकडे असल्याचे श्री. गुप्ता यांनी कळविले आहे.

## शब्दकोडे क्र ५९



आडवे शब्द १. मुंबईत २००८ साली झालेल्या अतिरेकी हल्ल्यात वीरगती प्राप्त झालेले तीन प्रमुख अधिकारी ३. अनाथ ११. कारस्थान १२. खंदक १३. अंड्यातील पिवळा भाग १५. मलईदार बासुंदी १७. धोबी १९. गुजराथी नृत्यप्रकार २२. वितरण २३. फळातील द्रव २४. कोलकाताचे विमानतळ २७. ठावठिकाणा २८. युवक २९. विचित्र ३१. बांबूचे कुसळ ३२. केस काळे करण्याचे साधन ३४. गर्दभ ३५. दयाळू ३७. कोर्टातील दावा ३८. बारीक दगड ३९. हट्टी, दुराग्रही ४१. शिखर,ढिगाचा चिंचोळा भाग ४३. बडबड्या ४४. धडक ४८. शाहिरजवळचे एक छोटे चर्मवाद्य ५०. कापडी बंद, फत ५१. एक ध्वज, एक रंग ५२. कडू ५३. खांद्यावरून घेण्याचे वस्त्र ५४. एक सुगंधी पांढरे फूल ५५. नम्र, वाकलेला ५७. काम लांबणे ५९. नुकताच सरलेला दिवस ६०. परीक्षा, निवड ६२. कठीण प्रसंग ६३. वाद्य वाजवणारा ६५. एका घराण्याचे राज्य ६७. प्रश्न ६९. रम्य ७१. कुत्रा ७३. मध्यस्थ ७५. रुचीहीन ७७. पाठोपाठ ७८. पटल ७९. गाव, नगर ८०. मृत्यूदेवता ८२. रक्षण करणारा ८३. आणि ८४. उत्कर्षाचा काळ उभे शब्द १. बांगड्यांचा व्यवसाय करणारा २. छोटा डोंगर ३. बक्षीसाचा पल्ला ४. पदार्थ शिजतानाचा आवाज ५. सारक ६. तात्पर्य ७. कसदार ८. खोडण्याचे साधन ९. कुबड १०. शरीर १४. लुच्चा १६. फासळी १८. जपजाप्य १९. ढीग २०. नड २१. विहीर २२. दुर्गंधी येऊ लागलेला २३. तोफगाडी २५. सुगंधी पाने २६. अंत:करण २७. नमुनेदार २९. अपमान ३०. वाईट याअर्थी लागणारा प्रत्यय, उदा.कुख्यात ह्न नाम ३३. कपाळ ३६. सुदैवी ३७. चिकटविण्यासाठी वापरला जाणारा एक पदार्थ ३८. शाब्दिक हजामत ४०. मातीमोल ४२. मगज ४६. शरीर, अवयव ४७. हुशार, चुणचुणीत ४९. लोकर (इंग्रजी) ५१. लवकर, वेगाने ५३. मेहरबानी ५६. सर्वनाश (हिंदी) ५७. पहारेकरी ५८. झाकणाचे पात्र ५९. कावळा ६१. आवड, रुची ६३. किराणा व्यापारी ६४. कीव करण्याजोगे ६५. ढग, दाट ६६. शाळेतील शिक्षक ६८. सत्ता ७०. सुसर ७१. नाकावाटे हवा घेणे ७२. जनावर ७४. दहाचा संच ७६. वाळूवर रेघा ओढून भविष्य सांगणे ८१. मयूर

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# अनुसूचित जातीच्या १००० युवक – युवतींसाठी मोफत कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

## बार्टी, पुणे व लर्नेट स्किल्स लिमिटेड, दिल्ली यांच्यात झाला सामंजस्य करार!

पुणे/प्रतिनिधी:बार्टीचे महासंचालक श्री. सुनील वारे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या १००० उमेदवारांना मोफत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे (महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था) आणि लर्नेट स्किल्स लिमिटेड, दिल्ली (स्कूलनेट इंडिया ची उपकंपनी तसेच नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC) च्या भागीदारीत व देशातील सर्वात मोठी व्यावसायिक कौशल्य कंपनी) यांच्यामध्ये दिनांक १३/०७/२०२३ रोजी सामंजस्य करार करण्यात आला असून यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास प्रशिक्षणाचे विविध प्रशिक्षण कार्यक्रम सन २०२३-२४ या वर्षात राबविण्यात येणार आहेत. सामंजस्य करारासाठी बार्टीचे प्रतिनिधी म्हणून श्रीम. इंदिरा अस्वार, निबंधक, श्री. अनिल कारंडे, विभाग प्रमुख (प्रशिक्षण व कौशल्य), श्रीम. वृशाली शिंदे, विभाग प्रमुख (संशोधन), श्रीम. प्रज्ञा मोहिते, कार्यालय अधिक्षक (प्रशिक्षण व कौशल्य), श्री. महेश गवई, प्रकल्प व्यवस्थापक (कौशल्य विकास विभाग), राहुल गित्ते, प्रकल्प अधिकारी (कौशल्य विकास विभाग) तसेच लर्नेट स्किल्स लिमिटेड, दिल्ली संस्थेचे प्रतिनिधी म्हणून श्री. सुनील जोसेफ, (झोनल हेड, महाराष्ट्र) व ऋषिकेश शेडगे, (स्कीलिंग हेड, महाराष्ट्र), श्री.योगेश देसाई, (मोबिलायझेशन मॅनेजर) हे उपस्थित होते.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे कुशल व्हा व नोकरी मिळवा या संकल्पनेतून नवीन पिढीतील युवक – युवतींसाठी रोजगार आणि उद्योजक करण्यासाठीचे कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. सदरील प्रशिक्षण हे महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, औरंगाबाद व रायगड या जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार आहेत. प्रशिक्षणाचा लाभ अनुसूचित जातीच्या (SC) प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना घेता येईल. सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी महाराष्ट्रातील रहिवासी असावा व वयोमर्यादा १८ ते ३५ वर्षे असणे अनिवार्य आहे. प्रशिक्षणार्थ्यांची निवड लर्नेट स्किल्स लिमिटेड, दिल्ली संस्थेकडून प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे व तसेच प्रशिक्षणार्थ्यांची बौद्धिक आणि कौशल्य क्षमता तपासून केली जाईल.

बार्टी, पुणे व लर्नेट स्किल्स लिमिटेड, दिल्ली या दोन संस्थांमध्ये सामंजस्य करार यशस्वीरित्या पुर्ण झाला असून त्या अंतर्गत Hydraulic Pneumatic Fitter, CNC Operator-Turning, Industrial Welder, Commercial Vehicle Driver Basic Maintenance Repairing, -ssistant Construction Painter Decorator, -ssistant Electrician, Domestic Data Entry Operator, Food Beverage Service-Steward, General Duty -ssistant, Helper Mason, Plumber General, Mechatronics, Business Development Executive, Entrepreneurship Development Program, इत्यादी २ ते ६ महिने कालावधीचे प्रशिक्षण कार्यक्रम १००० युवक – युवतींसाठी राबविण्याचे प्रस्तावित आहे.

सदर कौशल्य प्रशिक्षणाची संपूर्ण माहिती ऑगस्ट २०२३ पासून बार्टीच्या संकेत स्थळावर (https://barti.in/) उपलब्ध असेल. महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांनी सदरील मोफत कौशल्य प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व उज्वल भविष्य घडवावे असे आवाहन बार्टीचे महासंचालक श्री. सुनील वारे यांनी केले आहे.

# सौर प्रकल्पासाठी सबस्टेशननिहाय आवश्यक जमिनींची निश्चिती त्वरित करावी : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आढावा बैठक

मुंबई : मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मधील सौर प्रकल्पासाठी सबस्टेशननिहाय आवश्यक सुयोग्य जमिनींची निश्चिती योग्यता तपासून त्वरित करावी. या जमिनी नोडल एजन्सीला हस्तांतरित करण्यासाठी मिशनमोडवर काम करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० संदर्भात आढावा बैठक झाली. यावेळी अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, उपमुख्यमंत्री यांचे सचिव डॉ श्रीकर परदेशी हे उपस्थित होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ही राज्याची महत्वाकांक्षी योजना आहे. वातावरण बदलाचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणावर जाणवत असल्याचे आपण सर्वजण पाहत आहोत. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर झपाट्याने वाढला पाहिजे. यातून उद्योगांना कमी दराने वीज मिळण्यासाठी तसेच पर्यावरण संवर्धनासाठीही मदत होणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना अतिशय उपयुक्त ठरणार असल्याने या कामांना वेग देण्यात यावा. सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. महाराष्ट्र राज्याची ही महत्वाकांक्षी योजना आता केंद्र सरकारनेही स्वीकारली आहे. या योजनेमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या पहिल्या ५ जिल्ह्यांना पारितोषिक देण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या योजनेअंतर्गत कृषीभार असलेले २७३१ सबस्टेशन निश्चित करण्यात आले असून या सबस्टेशनची क्षमता १७८६८ मेगावॅट आहे. यासाठी ८८४३२ एकर जागेची आवश्यकता असून ३५ हजार एकर जमीन निश्चित झाली आहे. ५३ हजार एकर जमीन अजून निश्चित करणे अपेक्षित आहे. यासाठी महाराष्ट्र राज्य सोलर ॲग्रो कं स्थापन करण्यात आली आहे. नाशिक,सोलापूर, अहमदनगर, नागपूर, धुळे-नंदुरबार ही ५ क्लस्टर पहिल्या टप्प्यात निवडण्यात आली असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# पूर्व उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा अंतिम निकाल व गुणवत्ता यादी प्रसिद्ध

पुणे : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे मार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) परीक्षेचा अंतिम निकाल व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता याद्या परिषदेच्या www.mscepune.in व https://www.mscepuppss.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. १२ फेब्रुवारी रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी ) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ८ वी ) परीक्षेचा अंतरिम (तात्पुरता) निकाल २९ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आला होता. या निकालाच्याअनुषंगाने २९ एप्रिल २०२३ ते ९ मे २०२३ या कालावधीत संबंधित शाळेमार्फत गुणपडताळणीसाठीचे ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. प्राप्त अर्ज निकाली काढून या परीक्षांचा अंतिम निकाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. या अंतिम निकालावरून शासनमान्य मंजूर संचांच्या अधीन राहून शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादीही तयार करण्यात आली आहे.या परीक्षेस प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यास अंतिम निकाल परिषदेच्या या संकेतस्थळावर वैयक्तिकरित्या स्वतःचा बैठक क्रमांक टाकून बघता येणार आहे. तसेच शाळांना त्यांच्या लॉगीनमध्ये शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचा निकाल एकत्रितपणे बघता येणार आहे. तथापि शिष्यवृत्तीधारक झालेल्या विद्यार्थ्याचे गुणपत्रक त्याच्या बँक खात्याची व आधार क्रमांकाची माहिती भरल्याशिवाय पाहता किंवा डाऊनलोड करता येणार नाही. संकेतस्थळावरील गुणवत्ता यादीत त्याला स्वतःचा शिष्यवृत्ती संच प्रकार (अर्हता) बघता येणार आहे. संकेतस्थळावरील प्रसिद्ध करण्यात आलेली शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची माहिती, तसेच इतर अनुषंगिक माहितीची लिंक पुढीलप्रमाणे आहेत. अंतिम निकाल (विद्यार्थ्यांसाठी), गुणवत्ता यादी (राज्यस्तरीय,जिल्हास्तरीय,तालुकास्तरीय) शाळा सांख्यिकीय माहिती (जिल्हानिहाय,तालुकानिहाय) विद्यार्थी, पालक, शाळा, क्षेत्रिय अधिकाऱ्यांना लिंकवर क्लिक करून माहिती डाऊनलोड करता येईल, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेच्या उपायुक्त शैलजा दराडे यांनी दिली आहे.

# डिजिटल इंडिया सप्ताह २५ जुलैपासून, नागरिकांना मिळणार केंद्रीय योजनांची माहिती

पुणे : भारत सरकारतर्फे २५ ते ३१ जुलै दरम्यान 'डिजिटल इंडिया' सप्ताह साजरा करण्यात येणार असून र्व नागरिकांना ई-गव्हर्नन्स सेवांबद्दल माहिती देण्यात येणार आहे. तंत्रज्ञानाचा अधिक वापर व्हावा यासाठी हा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी नोंदणी केल्यास नागरिकांना विविध कार्यक्रमांमध्ये सहभाग घेता येईल. भारताचे तंत्रज्ञान क्षेत्रातील काम जगासमोर आणणे, टेक स्टार्टअप साठी सहयोग व व्यवसायाच्या नवीन संधी शोधणे, नवीन पिढीला प्रेरणा देणे, नागरिकांना ई-गव्हर्नन्स सेवांची माहिती देणे आणि तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे यासाठी या सप्ताहाचे आयोजन होत आहे. याअंतर्गत राष्ट्रीय स्तरावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून त्यात सहभागी होण्यासाठी http://www.nic.in/diw2023-reg ह्या लिंकवर नोंदणी करणे आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञान विषयाच्या विद्यार्थ्यांनाही या क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञान विषयांवरील व्याख्याने व चर्चा यामध्ये सहभागी होण्याची विनामूल्य संधी याद्वारे उपलब्ध होईल. अधिकाधिक नागरिकांनी नोंदणी करून ह्या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी प्रमोद बोरोले यांनी केले आहे.




# कळंबच्या इटकूर प्रशाला स्पर्धा परीक्षांत तालुक्यात अव्वल

कळंब : तालुक्यातील इटकूर प्रशाला ही जिल्हा परिषदेची शाळा सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये एक आगळावेगळा पॅटर्न निर्माण करत असून गतवर्षी झालेल्या नवोदय, शिष्यवृत्ती तसेच सैनिक स्कूल प्रवेश परीक्षांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी धारक होऊन कळंब तालुक्यात अव्वल क्रमांकाची प्रशाला म्हणून ओळख निर्माण झाली आहे. १२ जुलैला घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत इटकूर प्रशालेतील इयत्ता ५ वी तील तब्बल १५ विद्यार्थी पात्र झाले होते. त्यापैकी इयत्ता ५ वी मधून ५ विद्यार्थी जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत झळकले आहेत. त्यातील एक विद्यार्थिनी राष्ट्रीय ग्रामीण शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरली आहे. कळंब तालुक्यात एकूण ४३ विद्यार्थी धारक आहेत. त्यातील ५ विद्यार्थी इटकूरचे आहेत, ही गौरवास्पद बाब आहे. तसेच नवोदय विद्यालयासाठी या शाळेतून ४ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. त्याचप्रमाणे सातारा सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करून परीक्षेस बसवणारी एकमेव प्रशाला ठरली आहे. त्याही परीक्षेत ८ विद्यार्थी सैनिक स्कूल साठी पात्र ठरले होते.

सिद्धी रामलिंग कानडे (राष्ट्रीय ग्रामीण), संस्कृती अर्जुन भारती, समर्थ किरण मिटकरी, रिया विकास कोठावळे, सिद्धी महादेव पावले हे विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत.

या सर्व स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रशालेतील शिक्षक अनिल क्षिरसागर व अंजली यादव यांचे मार्गदर्शन लाभत आहे. प्रशालेच्या या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे



मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल गांधी, शिक्षणाधिकारी सुधा साळुंखे, गटशिक्षणाधिकारी धर्मराज काळमाते, विस्तार अधिकारी सुशील फुलारी, केंद्रप्रमुख पांडुरंग गामोड, मुख्याध्यापक तुकाराम गरूडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिदास पावले व समस्त इटकूर ग्रामस्थ अशा सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.


# जैन आचार्य कामकुमारनंदीजी महाराज यांच्या निर्गुण खून बद्दल शिरोळ तहसीलदार यांना निवेदन देऊन खून करणाऱ्यांना कडक शिक्षा करावी.

शिरोळ/नामदेव निर्मळे: शिरोळ तालुका शिरोळ येथील तहसीलदार यांना हिरीकुडी तालुका चिकोडी कर्नाटक येथे जैन आचार्य कामकुमारनंदीजी महाराज यांची हत्या करणाऱ्यांची सखोल चौकशी करून शिक्षा झाली पाहिजे व सर्व साधूसंतांना सुरक्षा देण्यात यावे या मागणीसाठी निवेदन देण्यात आले. निवेदन भारतीय जनता पार्टी जैन प्रकोष्ट व बजरंग दल व सर्व हिंदू संघटना शिरोळ तालुका यांच्यावतीने आज तहसीलदार कार्यालय व पोलीस निरीक्षक साहेबांना निवेदन देण्यात आला.



यावेळी तालुक्यातील प्रमुख उपस्थित उमेश संभूशेटे, मेजर सुनील पाटील,महावीर तकडे,मुकुंद गावडे,जयपाल काणे ,महेश देवताळे,सुनील शिंदे,रवी शहापुरे,गौतम किनिंगे,सौरभ पाटील ,किरण कमते.शिरीष निटवे.प्रमोद भेंडवडे.संजय नरगतचे. दीपक बगाडे.मदन उगळे.रोहित सूर्यवंशी. श्रेयांस हेमगिरे.सुभाष कोरे. तेजस जाधव. सुधाकर तेरदाळे.तातोबा कोरडे.संजय टारे.प्रकाश जगनाडे. सुरज कनिरे.अनिल पाटील.सुशांत मांजरे.दादासो गुंडवाडे. व सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जर्नलिझम परिक्षेत शोएब काझी यांचे यश सर्वत्र होतय कौतुक व अभिनंदन



वागदरी/प्रतिनिधी: नळदुर्ग शहरातील पत्रकार शोएब काझी यांचे जर्नलिझम परिक्षा उत्तीर्ण झाले आहेत त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक अभिनंदन होत आहे सविस्तर वृत्त असे की नळदुर्ग शहरातील सोलापूर नामाचे पत्रकार शोएब काझी यांनी सोलापूर येथे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक द्वारा घेण्यात आलेल्या Diploma In mass Camunic ations and JarnIist , वृत्तविद्या जनसंज्ञापन पदविका अभ्यासक्रम २०२३ -२४ या आभ्यासक्रमात नळदुर्ग येथील सोलापूर नामाचे पत्रकार शोएब इरफान काझी यानी घवघवीत यश मिळविले आहे . शोएब काझी हे नळदुर्ग येथील सोलापूर नामाचे एक धाडसी पत्रकार म्हणून त्यांची नळदुर्ग आणि परिसरामध्ये खूप मोठी गणना आहे या यशा मुळे नळदुर्ग आणि परिसरातील सर्व स्तरातून कौतुक अभिनंदन होत आहे .

# 'शासन आपल्या दारी' अंतर्गत दक्षिण सोलापूर कार्यालयातर्फे महाशिबिर

सोलापूर/प्रतिनिधी: विविध प्रकारच्या सरकारी सेवा योजनांचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी तहसील कार्यालय, दक्षिण सोलापूरच्या वतीने कासेगांव येथे 'शासन आपल्या दारी' हे अभियान राबविण्यात आले. या अभियानातंर्गत ११९ विविध दाखल्यांचे लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले असल्याचे तहसिलदार राजशेखर लिंबारे यांनी सांगितले.

'शासन आपल्या दारी' व महा राजस्व अभियानांतर्गत तहसील कार्यालय, दक्षिण सोलापूरच्या वतीने कासेगांव येथे महाशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास गटविकास अधिकारी शितल बुलबुले, तालुका पशुधन विकास अधिकारी श्री जाधव, नायब तहसीलदार दत्तात्रय गायकवाड, नायब तहसिलदार आरती दाबाडे, कासेगांव विकास मंचचे यशपाल वाडकर तसेच संबंधित विभागाचे अधिकारी कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते.




शासनाची नागरिकांना दस्तऐवज उपलब्ध करुन देणारी ही कार्यालये वेगवेगळ्या ठिकाणी असल्याने योजनेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना वेगवेगळ्या कार्यालयात जावे लागते.

तसेच सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास त्या दूर करण्यासाठी वारंवार त्या कार्यालयामध्ये जावे लागते. काही वेळा अनेक लोकांना शासनाकडून त्यांना देय असलेल्या योजनांची माहिती नसते आणि माहिती अभावी या योजनांचा लाभ गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे या योजनांचा उद्देश पूर्णपणे सफल होत नाही. यासाठी शासनाने 'शासन आपल्या दारी' हे अभियान सुरु केले असल्याचे तहसिलदार राजशेखर लिंबारे यांनी यावेळी सांगितले. तसेच तालुक्यातील जास्तीत-जास्त नागरिकांनी या अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

महसूल विभागाच्या वतीने एकूण ६३ उत्पन्नाचे दाखले, १६ जातीचे दाखले, ०७ नॉन क्रिमीलेअर दाखले, ०८आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक दाखले, २५ रहिवासी दाखले वितरण करण्यात आले.या अभियानात एकूण ११९ दाखल्यांचे वाटप करण्यात आले. तसेच महाराष्ट्र महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत ५ लाभार्थ्यांना सिंचन विहिरीचा कार्यारंभ आदेश देण्यात आला.

शिबिराच्या माध्यमातून नागरिकांचे कष्ट वाचले आणि त्यांना योजनांचा लाभ मिळाला याचे समाधान जास्त आहे. सर्व अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी चांगले प्रयत्न केले. यापुढेही अशाच मोहिमा राबवून सरकारी योजनाचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल. असे कासेगाव विकास मंचचे यशपाल वाडकर यांनी सांगितले.